MHBI140023492022

सरकार वि. सुनिल चव्हाण
नि. क्र. ११ खाली

# न्यायनिर्णय

(अधिघोषणा दिनांक १८ सप्टेंबर, २०२५)

खटल्याचे निर्णयाकरीता खालील मुद्दे उत्पन्न होतात. त्यावरील निष्कर्ष मी खालील नमुद केलेल्या कारणमिमांसेसह विषद करीत आहे –

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपी हा दिनांक १८/०९/२०२२ रोजी १६.४५ वाजताचे सुमारास मौजे आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे बाजारतळ येथील स्वतःच्या घराच्या बाजुला आपल्या ताब्यात ४० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारुचा मुद्देमाल विनापरवाना म्हणजेच अवैधरित्या स्वतःच्या फायद्यासाठी किंवा विक्रीसाठी बाळगतांना मिळून आला? | **नाही.** |
| २) | आदेश काय? | **अंतिम आदेशान्वये आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

# कारणमिमांसा

२. अभियोगपक्षाने आरोपीच्या विरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता केवळ ०१ साक्षीदार तपासला. साक्षीदार क्र.१ पोलीस हवालदार विलासराव रामु गुंडाळे याला फिर्यादी म्हणून तपासले. अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर रासायनिक विष्लेशन अहवाल दाखल नसल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच, आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही. आरोपीने बचावात कोणताही पुरावा दिलेला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u>** –

३. साक्षीदार क्र.१ पोलीस हवालदार विलासराव रामु गुंडाळे हा फिर्यादी आहे. त्याने त्याच्या साक्षीत असे कथन केले आहे की, दिनांक १८/०९/२०२२ रोजी तो आष्टी पोलीस ठाणे येथे पोलीस शिपाई म्हणुन कार्यरत असताना आष्टी येथील बाजारतळामध्ये प्रस्तुत खटल्यातील आरोपी हा गावठी हातभट्टीची तयार दारु बेकायदेशीर रित्या विक्री करत असल्याची बातमी त्याला मिळाली. सदरील बातमीची माहिती त्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.देशमुख यांना देवुन तो, श्री.धनवडे व श्री.गुजर असे दोन पंचासह बातमीच्या ठिकाणी जाऊन १७.०० वाजता छापा टाकला असता तेथे आरोपी हा त्यांना गावठी हातभट्टीची दारु विक्री करत असतांना मिळुन आला. तेथे आरोपीच्या ताब्यात एका पांढऱ्या रंगाच्या कॅन मध्ये ४० लिटर गावठी दारू त्यांना मिळुन आली. सदरील मुद्देमाल श्री.सातव यांनी दोन पंचासमक्ष जप्त केला होता व त्यामधुन एक बाटली दारु रासायनिक परिक्षणासाठी सिलबंद करुन उर्वरीत मुद्देमाल घटनास्थळावर नष्ट केला व त्याचा नि.१७ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. त्यानंतर ते आरोपी व जप्त नमुना मुद्देमालासह आष्टी पोलीस ठाणे येथे गेले व तेथे त्याने नि.१८ वरील प्रथम खबर नोंदविली. साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की, घटनास्थळ हे भर वस्तीत आहे, घटनास्थळावरील मिळकतीचे मालकी हक्काचे कागदपत्रे त्याने हस्तगत केलली नाहीत व नमुना घेतलेली दारुची बाटली त्यांनी निर्जंतुकीकरण केलेली नव्हती. साक्षीदाराने उलटतपासादरम्यान इतर सुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी कथन केली.

४. प्रस्तुत खटल्यामध्ये पंच साक्षीदार मिळुन आले नाहीत. अभिलेखावरील पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, अभियोगपक्षाने रासायनीक विश्लेशन अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही. फिर्यादी हा पोलीस अधिकारी असल्याने त्याची साक्ष औपचारीक स्वरुपाची आहे. त्यामुळे त्याच्या तोंडी पुराव्यास बळकटी येत नाही. त्यामुळे अभिलेखावर आरोपीकडून गावठी हातभट्टीची दारु जप्त करण्यात आली, जप्तीतील मुद्देमालातून रासायनिक परिक्षणाकरीता नमुना तयार करण्यात आला हे सिध्द होत नाही. तसेच, रासायनिक परिक्षण अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नसल्यामुळे

जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा दारुच होता हे देखील सिध्द होत नाही. परिणामतः अभियोगपक्ष आरोपी हा आपल्या ताब्यात गावठी हातभट्टीची दारु बाळगतांना मिळून आला ही बाब शंकेपलीकडे जाऊन सिध्द करु शकला नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करीता** –

५. मुद्दा क्र. १ च्या निष्कर्ष व कारणमिमांसेवरुन अभियोगपक्ष आरोपीच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) नुसार गुन्हा केल्याचे सिध्द करीत नाही. त्यामुळे आरोपी हा सदर अपराधातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. अतंतः मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो –

## आदेश

१. आरोपी सुनिल मच्छिंद्र चव्हाण, रा. बाजारतळ, आष्टी, ता.आष्टी, जि.बीड यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) या गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ (अ) विचारात घेता या न्यायनिर्णयास आव्हान देण्यात आल्यास अपिलीय न्यायालयासमोर आरोपीची हजेरी निश्चित करण्याकरीता त्याने या आदेशापासुन पुढील सहा महिन्याकरीता रुपये १५,०००/– चे जामीन बंधपत्र करुन द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

KESHAV KRISHNA KHOMANE
Digitally signed by KESHAV KRISHNA KHOMANE
Date: 2025.09.20 10:59:26 +0530

ठिकाण – आष्टी.
दिनांक – १८/०९/२०२५.

(के. के. खोमणे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), आष्टी

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 18/09/2025
Transcribed on : 18/09/2025
Checked & signed on : 18/09/2025

**Sd/-**
Patait N.A.
(Jr.Clerk)